# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/014/2020/**0240** Dt. 06.03.2020

प्रति,
श्री. विठ्ठलराव गायकवाड (सरचिटणीस),
मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन, विभागीय कार्यालय,
भारत कुंज बिल्डींग, २ रा मजला,
व्ही. एन. देसाई हॉस्पिटल जवळ,
दिनकर पटेल उद्यान समोर, ६ वा रस्ता,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००५५.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. १७.०२.२०२० रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.१७.०२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दावा क्र. २००/२०१७ वर दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी आस्थापनामधील ३००० (तीन हजार) स्थायी कामगार व १७०० (एक हजार सातशे) अधिकारी यांना प्रत्येक महिन्याच्या वेतन, भत्ते, बोनस (सानुग्रह-अनुदान) व इतर सोयी सवलतीवर सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ साली खर्च केलेल्या रकमेचा तपशिल मिळावा. | आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाचे आदेश दि. १२.०९.२०१८ च्या प्रकरण २०० चा २०१७ मध्ये उपलब्ध आहे. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे. |
| २ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दावा क्र. २००/२०१७ वर दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी आस्थापनामध्ये सतत व सलग काम करणाऱ्या ५९०० (पाच हजार नऊशे) कंत्राटी कामगारांना सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ सालामध्ये प्रत्येक महिना दिले जाणारे वेतन, भत्ते, बोनस (सानुग्रह-अनुदान) रक्कम व इतर सोयी सवलतीवर खर्च केल्या जाणाऱ्या रक्कमेचा तपशील मिळावा. | |
| ३ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दावा क्र. २००/२०१७ वर दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आदेशामध्ये नमुद केलेला प्रवर्तन आणि परिरक्षा (O&M) खर्च रक्कम कोण कोणत्या बाबींचा उल्लेख आहे त्याचा सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ मध्ये खर्च केल्या जाणाऱ्या रक्कमेचा तपशिल मिळावा. | |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) अन्वये श्री. अनिलकुमार उके, संचालक (विधी) अतिरिक्त कार्यभार /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर 1, 13 वा मजला, कफ परेड, मुंबई - 400005. टेलिफोन नं. 022-22163964/65/69 **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी